नियमित दिवाणी दावा क्रं.२२६/२०१२ (जुना स्पे.दि.क.नं.२१९/२००१ व ४२९/०५) मधील निशाणी क्रं.२३१ वरील आदेश

०१. वादी नं.७ हिने प्रस्तुतचा दावा हा वाटणी, हक्कज्ञापन, कब्जा व मनाई मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादी नं.७ हिने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ अन्वये केलेला आहे.

०२. यातील वादी नं.७ तर्फे थोडक्यात अभिकथन खालीलप्रमाणे.

वादी नं.७ हिने प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी नं.७ व ८ यांचेविरूध्द तुर्तातुर्त मनाईकरीता अर्ज दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी नं.७ व ८ यांनी दावा मिळकत कलम १ मधील अ.क्रं.६ ची मिळकत विक्री केलेली आहे. वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेनंतर सन – २००६ मध्ये जाहीर नोटीस देवून दावा मिळकत खरेदी करू नये अशी नोटीस प्रसिध्द केली होती. परंतु, यातील प्रतिवादी नं.७ व ८ यांनी दावा मिळकत १-अ, अ.क्रं.५, गट नं.४७५/४, क्षेत्र ०७ आर ही श्री.दिपक रामगोंडा पाटील यांना दिनांक ११/१२/२००६ रोजी विक्री केली. सदरचा व्यवहार हा दावा प्रलंबित असताना झाल्याने श्री.दिपक रामगोंडा पाटील यास प्रस्तुत दाव्यात पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज हा सरनाम्यामध्ये प्रतिवादी नं.१५ म्हणून दुरूस्ती होणेकरीता व त्या अनुषंगाने दावा पान नं.७ मध्ये जादा मजकुर लिहीणेबाबत व दावा कलम ९ मध्ये मजकुर नमुद करणेकरीता दावा दुरूस्ती परिशिष्ट दाखल केले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०३. यातील प्रतिवादी नं.१ ते ८ यांनी त्यांचे म्हणणे देवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केले की, प्रस्तुतच्या अर्जास योग्य खबरदारीची बाधा येते.

०४. वादी नं.७ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एच.पाटील व प्रतिवादी नं.७ व ८ तर्फे विधीज्ञ श्री.डी.डी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जात व म्हणण्यात नमुद मजकुराप्रमाणे युक्तीवाद केला. युक्तीवादाच्यावेळी इतर प्रतिवादी व विधीज्ञ श्री.ए.आर.जाधव हे वारंवार पुकारले असता गैरहजर राहिले.

०५.    वर नमुद संपूर्ण बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, वादी नं.७ हिने प्रस्तुतचा अर्ज हा सरनाम्यात व वादपत्रात दुरूस्ती करणेकामी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटणी, हक्कज्ञापन, कब्जा व मनाईकरीता दाखल करण्यात आलेला आहे. वादी हिने निशाणी क्रं.२३३/१ वर सुची क्रंमांक II ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. सदर सुची क्रंमांक II चे अवलोकन केले असता असे दिसून आले की, श्री.मोहनराव गुंडो नाईक, श्री.रामचंद्र गुंडो नाईक, श्री.रमेश राजाराम नाईक, श्री.उमेश राजाराम नाईक, श्री.शंकर शिवराम स्वामी, श्री.रमेश शिवराम स्वामी, श्री.नंदकुमार शिवराम स्वामी यांनी सव्हे क्रं.४७५/४ यासी सि.स.नं.४७५/४ क्षेत्र ०७ आर ची विहीरपड मिळकत ही श्री.दिपक रामगोंडा पाटील यांना रक्कम रू.१,६५,०००/- इतक्या मोबदल्यास दिनांक १८/१२/२००६ रोजी खरेदीदस्त क्रं. ६१२२/२००६ ने विकली आहे. वादी हिने सव्हे नं.४७५/४ मध्ये वाटणी, हक्कज्ञापन वगैरेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा दिनांक ०२/०५/२००१ रोजी  दाखल केलेला आहे. सदरचा खरेदीदस्त हा दिनांक १८/१२/२००६ रोजी करण्यात आला आहे. प्रस्तुतचा दस्त हा दावा प्रलंबित असताना करण्यात आला. प्रस्तुत दाव्यात ब-याच झालेल्या दुरूस्तीनंतर दिनांक १७/१०/२०१३ रोजी पुन्हा मुद्दे काढण्यात आले. त्यानंतर प्रस्तुतचा दावा हा सरतपासाचे प्रतिज्ञालेख दाखल करणेकरीता आजपावेतो प्रलंबित आहे.

०६.    मी याखाली मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या न्यायनिवाडयातील खालील न्यायतत्व नमुद करीत आहे.

1. ***Mahadev Bhanje V/s Baliji Shivaji Pathade reported in 2012(5) Bom.C.R.777 .***

*“ The trial in a civil suit commences from the date of filing of affidavits in lieu of the examination in chief of the witnesses and proviso to Order 6, Rule 17 of the Code of Civil Procedure, 1908 will come into play only after stage of filing of affidavits in lieu of examination in chief of witnesses.”*

प्रस्तुत दाव्यामध्ये अद्याप वादीतर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र देण्यात आलेले नाही.

०७. तसेच मी याखाली खालील न्यायानिवाडयाचा आधार घेत आहे.

***1. Pankaja V/s Yellappa reported in 2005(2) Bom.C.R. 273.***

प्रस्तुत न्यायनिवाड्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने मुदतबाह्य मागणीबाबत मुद्दा काढुन त्यावर कायद्याप्रमाणे योग्य ती चौकशी होवुन निर्णीत करण्याचे गरजेचे असल्याचे नमूद करुन दुरुस्तीच्या वेळी याचा विचार करु नये असे नमुद केले आहे.

०८. वर नमुद बाबींचा विचार करता व भारतीय मुदतीचा कायदा कलम २१ व १७ मधील तरतुदींचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, एखादया दाव्यामध्ये नवीन प्रतिवादी म्हणून सामील करणे अगर त्याऐवजी दुस-या व्यक्तीस सामील केल्यास सदर व्यक्तींना दावा दाखल केलेल्या दिवशीच सामील केले असे समजले जाते.

०९. वादी हिने प्रस्तुतचा अर्ज हा शपथपत्रावर दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ निर्णयाअंती उदभवणारे प्रश्न निर्णीत करणेकामी गरजेचे असल्याने दुरुस्ती करणेबाबत आदेश करता येईल अशी तरतुद आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) अन्वये न्यायालयास वाटल्यास हुकुमनाम्याची परिणामकारक बजावणी होणेकामी व योग्य तो निकाल लावणेकामी पक्षकारांना दाव्यात सामील करणेबाबत तरतुद नमुद आहे. तसेच, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम ७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी हिला तिच्या हुकुमनाम्याची परिणामकारक बजावणी होणेकामी पक्षकारांना सामील करण्याची मुभा आहे.

१०. मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी दुरुस्तीबाबत योग्य ती खबरदारी घेतल्यास व दुरुस्तीचे निर्णय सौम्य विचाराने घेवून विरुध्द बाजूस नुकसान होणार नाही, दाव्याचे स्वरुप बदलणार नाही व सदर दुरुस्ती ही दाव्यात निर्माण होणा-या वादग्रस्त खरेखुरे प्रश्न निर्णीत करणेस मदत होईल अशी दुरुस्ती असल्यास मंजूरी देणे न्यायोचित ठरेल असे न्यायतत्वात नमुद केले आहे. वर नमुद सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत दुरुस्तीचा अर्ज

हा निर्णयाअंती करणेकरीता प्रस्तुत दुरुस्ती मुळे प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होईल का, तसेच दाव्याचे स्वरुपामध्ये बदल होईल का, तसेच न्यायालयाचे अधिकारक्षेत्रात बदल होईल काय या बाबत विचार करणे जरुरीचे आहे.

११. वर नमुद सर्व बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता यातील प्रतिवादींनी प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे व प्रतिवादी म्हणून सामील केलेस दाव्याच्या स्वरूपात बदल होईल अगर त्यांचे अपरिमीत नुकसान होईल याबाबत सुसंगत असा कोणताच पुरावा याकामी दिलेला नाही. तसेच प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणा-या उभयपक्षकारांतील वाद प्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. तसेच या दुरुस्तीस प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधीही मिळणार आहे. तसेच प्रस्तुत अर्जास योग्य खबरदारीची बाधा येत नाही. सबब, वरील सर्व बाबींचा विचार केला असता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

## आ दे श

१. वादीचा निशाणी क्रं.२३१ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी नं.७ हिने प्रतिवादी नं.७ यास खर्चापोटी म्हणून रक्कम रु.३००/- (रु.तीनशे फक्त) दयावेत.

३. वादीने निशाणी क्रं.२३१ प्रमाणे दुरूस्ती ही आजपासून १४ दिवसांचे आत करुन दाव्याची दुरूस्ती प्रत दयावी.

४. संबंधीत लिपीकाने या दुरुस्तीची नोंद या दाव्याचे रजिस्टरला करावी.

(न्यायासनावरुन खुले न्यायालयात जाहिर केले)

सही/-
(ग.म.कोल्हापूरे)
५ वे सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर.

इचलकरंजी.
दिनांक :- १९/०६/२०१४